## नाशिक महानगरपालिका नाशिक
## गोदावरी संवर्धन कक्ष विभाग

मा.उच्च न्यायालय, मुंबई जनहित याचिका क्र.१७६/२०१२ चे अनुषंगाने नाशिक मनपा उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील जनहित याचिका क्र.१७६/२०१२ संदर्भात् गोदावरी नदी प्रदुषण नियंत्रणाबाबत नाशिक महानगरपालिका स्तरावरील उपसमितीची बैठक मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०७/०५/२०२४ रोजी सकाळी ११:३० वा. मा.आयुक्त कार्यालय येथील दालनात संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी यांनी प्रत्यक्ष व ऑनलाईन उपस्थिती नोंदविली.

१. डॉ.अशोक करंजकर,आयुक्त तथा प्रशासक, म.न.पा., नाशिक
२. डॉ.नितीन गोयल, संचालक NEERI
३. मोहिनी राणे, माहिती उपसंचालक,नाशिक
४. प्रदिप चौधरी, अतिरिक्त आयुक्त,(शहर), म.न.पा., नाशिक
५. स्मिता झगडे, अतिरिक्त आयुक्त,(सेवा), म.न.पा., नाशिक
६. अजित निकत, उपआयुक्त (गो.सं.क.), म.न.पा., नाशिक
७. शिवकुमार वंजारी, शहर अभियंता, म.न.पा., नाशिक
८. नितीन नेर,उपआयुक्त (अति.), म.न.पा., नाशिक
९. संजय अग्रवाल, अधिक्षक अभियंता, (मलनि.), म.न.पा., नाशिक
८. सुमंत मोरे, मुख्य कार्यकारी अधिकारी, ना.म्यु.स्मार्ट सिटी विभाग
९. हर्षल बाविस्कर, उपसंचालक, नगरनियोजन विभाग, म.न.पा., नाशिक
१०. आवेश पलोड, संचालक, घनकचरा व्यवस्थापन, म.न.पा ., नाशिक
११. बाजीराव माळी, कार्यकारी अभियंता (यांत्रिकी), म.न.पा., नाशिक
१२. राजेंद्र शिंदे, कार्यकारी अभियंता (पर्यावरण), म.न.पा., नाशिक
१३. नितीन धामणे, माहिती तंत्रज्ञान विभाग, म.न.पा., नाशिक
१४. गणेश मैड, कार्यकारी अभियंता (मलनि.), म.न.पा., नाशिक
१५. राजेश पंडित, अशासकिय सदस्य

सदर उपसमितीच्या बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थित केलेल्या मुद्यांवर चर्चा झाली.

| अ.क्र | विभागाचे नांव | खुलासा |
|---|---|---|
| ०१ | घनकचरा विभाग | • प्लास्टीक बाबत कारवाया केलेल्या असुन ७० केसेस करण्यात आलेल्या आहेत. ४७१ किलो प्लॅस्टिक जप्त करुन अंदाजे ४ लाखापर्यंत दंड आकारण्यात आलेला आहे. याबाबत महानगरपालिकेने महापालिका क्षेत्रात केलेल्या कारवाईचा अहवाल एमपीसीबीला पाठविणेत आलेला आहे.<br>मा.आयुक्त सो. यांनी सदरची कारवाई नियमीत करणेबाबत आदेशित केले. |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| ०२ | यांत्रिकी विभाग<br>घनकचरा विभाग<br>गोदावरी विभाग | • शहरी भागात पानवेली निर्मुलनाबाबत महानगरपालिका व जिल्हा परिषद करत असलेली कार्यवाही व उपाययोजना बाबत- सद्यस्थितीत नदीपात्रात पाण्याची पातळी कमी असल्याने ट्रॅश स्किमर मशिन स्थलांतरीत करणेत येऊन काम तात्पुरते थंबविणेत आले आहे. ट्रॅश स्किमर मशिनला मर्यादा असलेने पानवेली मनुष्यबळाव्दारे काढणे योग्य होईल व निवीदा प्रक्रिया राबवावी असे श्री.आवेश पलोड यांनी सांगितले.<br>• गोदावरी नदी व उपनदया परीसरात मोठया प्रमाणात पाणवेली झालेल्या असल्याने मा.आयुक्त सो. यांचेकडील आदेश, जा.क्र.मनपा/गो.सं.क./वशि/७९/२०२४, दि.८/५/२०२४ अन्वये- पावसाळी गटारी मधुन पावसाच्या पाण्या व्यतिरिक्त कोणतेही पाणी नदीपात्रात जाणार नाही याची दक्षता घेणे, तसे होत असल्यास तात्काळ संबंधित ठिकाणी पाणी बंद करण्याची कार्यवाही करणे तसेच मलजल शुध्दीकरण केंद्र (STP) येथुन कुठल्याही प्रकारचे अशुध्द पाणी नदीपात्रात मिसळणार नाही याची खात्री करणेबाबत अधिक्षक अभियंता, (मलनि:सारण) यांना कळविणेत आले आहे.<br>• नदीपात्रातील पानवेली काढणे संदर्भात ट्रॅश स्किमर, रोबोट, जेसीबी वाहतुकीसाठी ट्रक इ. आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देणेबाबत अधिक्षक अभियंता (यांत्रिकी) विभाग यांना कळविणेत आले आहे.<br>• गोदाघाट व नदीचे किनारे येथील साफसफाई करणे, नदीपात्रातील पानवेली काढणेस ज्याठिकाणी अडचण निर्माण होते त्याठिकाणी स्वतंत्र यंत्रणा तयार ठेवुन त्यावर विभागीय स्वच्छता निरीक्षक व स्वच्छता निरीक्षक यांचेमार्फत नियंत्रण ठेवणेबाबत संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभागास कळविणेत आले आहे.<br>• सर्व विभागीय कार्यालय यांचे कार्यक्षेत्रात येणाऱ्या गोदावरी नदी व तिच्या उपनदया या संदर्भातील सर्व प्रकारच्या तक्रारी विभागीय कार्यालय स्तरावर प्राधान्याने कार्यवाही करुन तात्काळ निकाली काढल्या जातील याची दक्षता घेणेबाबत तसेच गोदावरी व तिच्या उपनदया यांच्या नदीपात्रातील पानवेली काढणे, गोदावरी नदी किनारी नियमीत स्वच्छता राहील या दृष्टीने उपअभियंता (बांधकाम) यांच्याकडुन यंत्रसामुग्री उपलब्ध करुन विभागीय स्वच्छता निरीक्षक व स्वच्छता निरीक्षक यांचेमार्फत स्वच्छता विषयक कामे करणेबाबत सर्व विभागीय अधिकारी यांना कळविणेत आले आहे.<br>• मलेरीया विभागाने नदी किनारी व नाल्यांजवळ ज्या ठिकाणी पाणी थांबुन डासांची उत्पत्ती होते किंवा पानवेलींची वाढ होते अशा ठिकाणी उपलब्ध कर्मचाऱ्यांमार्फत नियमीत साफसफाई करुन डासांची उत्पत्ती होणार नाही यावर उपाययोजना करुन नियमीत स्वच्छता व जंतुनाशक फवारणी करणेचे काम तात्काळ सुरु करणेबाबत उपरोक्त आदेशान्वये कळविणेत आले आहे.<br>• गोदावरी नदीचा ठराविक (वेगवेगळा) भाग तयार करुन सदरचा भाग सामाजिक संस्थामार्फत साफसफाई करावा असे श्री.राजेश पंडीत यांनी सुचित केले.<br>मा.आयुक्त सो. यांनी प्रथम महानगरपालिकेच्या यंत्रणेमार्फत गोदावरी नदीची साफसफाई करणेत यावी व नंतर इतर पर्यायांचा विचार करावा असे आदेशित केले. |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| ०३ | स्मार्ट सिटी | • डी-कॉंक्रीटीकरणाचे अहवालाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, स्मार्ट सिटी, श्री.सुमंत मोरे यांनी अद्यापपावेतो श्री.पुजारी यांचेकडुन रिपोर्ट प्राप्त झाला नसल्याचे सांगितले.<br>मा.आयुक्त सो. यांनी डॉ.गोयल यांना श्री.पुजारी यांचेकडुन सदरचा रिपोर्ट लवकरात लवकर सादर करणेस सुचना केल्या. |
| ०४ | यांत्रिकी विभाग<br>मलनि:सारण विभाग | • सिवेज ट्रिटमेंट प्लांट मधून निघणाऱ्या पाण्याचे होणाऱ्या फोमींग बाबत-<br>STP मधुन बाहेर पडणाऱ्या पाण्याच्या ठिकाणी फेस (Foming) बाबत निरी संस्थमार्फत प्रत्यक्ष पाहणी होणे अपेक्षित आहे. सद्यस्थितीत उन्हाळा असल्याने फेस कमी प्रमाणात होत असल्याने सदर पाहणी दौरा हा उन्हाळयानंतर ठेवणेबाबत निरीच्या प्रतिनिधी यांचेशी चर्चा झाली असुन तत्पुर्वी मनपाने सद्यस्थितीत पाहणी करावी असे सुचित केलेनुसार उपआयुक्त् (गो.सं.क.), अधिक्षक अभियंता (यांत्रिकी), कार्यकारी अभियंता (यांत्रिकी), सहा.आयुक्त् (गो.सं.क.) यांनी दि.१०/०४/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली आहे. सदर ठिकाणी Sprinkler चा वापर असलेमुळे व उन्हाळा असल्याने फेसाचे प्रमाण कमी असल्याचे दिसुन आले आहे. निरी या संस्थेशी संपर्क साधुन, वेळ काढुन पुन:श्च पाहणी दौरा करणेबाबत मा.आयुक्त सो. यांनी आदेशित केले. |
| ०५ | मलनि:सारण विभाग | • गोदावरी, नंदिनी इ.नदयांमध्ये होणारा सिवेज डिस्चार्ज बंद करणेत आलेले आहेत तसेच चोपडा लॉन्स जवळच्या नाल्याचे फोडलेले चेंबर दुरुस्त करणेत आले आहे. सदर ठिकाणी नाल्याच्या दोन्ही बाजुस खाजगी प्लॉट धारकाचा भराव पडलेला असुन थोडया प्रमाणात डिस्चार्ज सुरु आहे. सिवेज ऑडीट रिपोर्टचे काम सल्लागारामार्फत केलेले असुन रिपोर्ट येणे बाकी आहे. तसेच सदर भागाचा नमामी गोदा प्रकल्पात समावेश होणार असलेचे अधिक्षक अभियंता श्री.अग्रवाल यांनी सांगितले.<br>• सिवेज ट्रिटमेंट प्लांटचे अपग्रेडेशन चा DPR तातडीने शासनास सादर करणेबाबत मा.आयुक्त् सो. यांनी आदेशित केले. |
| ०६ | उपसमिती | • ५० नाले व्हिजीट बाबत-<br>सदरबाबत जवळजवळ काम पुर्ण झाले असुन उर्वरित काम सुरु असल्याने सद्यस्थितीत लोकसभा निवडणुक असल्याने दिनांक २० मे २०२४ नंतर नाले पाहणी दौरा नियोजन करणेबाबत मा.आयुक्त सो. यांनी आदेशित केले आहे. |
| ०७ | बांधकाम विभाग | • सिमेंट कॉंक्रीटच्या भिंतीबाबत श्री.पगारे यांनी मुद्दा उपस्थित करुन महापालिकेने संबंधीतांवर कार्यवाही केली नसल्याबाबत नाशिक महानगरपालिका हद्दीतील गोदावरी नदी व उपनदया लगत कोणत्याही ठिकाणी सिमेंट कॉंक्रीटच्या भिंतीचे काम करणेत येत नसुन निरीने सुचित केलेनुसार आवश्यकतेनुसार गॅबीयन वॉलचे कामे करणेत येत असल्याचे, नाल्यात तळ कॉंक्रीटीकरणाचे कोणतेही काम करण्यात येत नसल्याचे तसेच गोदावरी नदी व उपनदयांवरील पुलाच्या कठडयांवर जाळ्या बसविणे या कामांचा कार्यारंभ आदेश निर्गमित झाला असुन मक्तेदारामार्फत पुर्वतयारीचे कामे सुरु करणेत आलेचे शहर अभियंता, श्री.शिवकुमार वंजारी यांनी सांगितले. |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| ०८ | नगररचना विभाग | • निळी पुररेषा जागेवर मार्किंग करणेबाबत सर्वेक्षण करणेत आले असुन सदरचा अहवाल येण्यास एक महिना लागणार असलेचे उपसंचालक, श्री.बावीस्कर यांनी सांगितले.<br>• निळी पुररेषेमध्ये व त्याला लागून बांधकामे असल्याच्या तक्रारी येत असल्याबाबत सर्वेक्षण करणेत येईल असे श्री.बावीस्कर यांनी सांगितले.<br>मा.आयुक्त सो यांनी सदरचे काम विभा.आयुक्त सो. यांचेकडे होणाऱ्या मिटींगपुर्वी करणे तसेच रेन वॉटर हार्वेस्टिंगबाबत बिल्डींग धारकांची सद्यस्थिती तपासणे बाबत देखिल आदेशित केले. |

येणेप्रमाणे चर्चा होउन बैठकीच्या शेवटी उपआयुक्त, गोदावरी संवर्धन कक्ष यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व बैठक संपल्याचे जाहीर करण्यात आले.

(डॉ.अशोक करंजकर)
आयुक्त तथा प्रशासक
नाशिक महानगरपालिका नाशिक

स्थळ : नाशिक महानगरपालिका, नाशिक
दिनांक :१५ /०५/२०२४
जा.क्र.गो.सं.क./वशि/८२/२०२४

Scanned by CamScanner